महाराष्ट्र शासन

# छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital Satara,

४६७, Sadar bazar, Camp, Satara ४१५००१

Phone No ०२१६२-२९९७६३ Email id :- deangmcsatara७@gmail.com

जा.क्र. छसंमशावैमवरुसा/ औषध भांडार / दरपत्रक मागणी / ०६०३ /२०२५ दि. १२ /०६/२०२५

## जाहीर सूचना

**संस्थेच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ऑनलाईन दरपत्रके मागणी**

**विषय -:** **कोरोना आजारासाठी संभाव्य लागणारे तसेच सर्वसाधारण रुग्णांसाठी अत्यआवश्यक लागणारे औषधे पुरवठ्यासाठी दरपत्रके मागविण्याबाबत.**

**संदर्भ -:** **१** दिनांक-: ०५/०६/२०२५ रोजी जिल्हाधीकारी कार्यालयात झालेल्या आपत्ती व्यवस्थापनबाबत मा. जिल्हा अधिकारी यांचे आदेश.

**२** जा.क्र.जिरुसा / भांडार/१२५०७/ दिनांक-:०३/०६/२०२५ रोजीचे पत्र.

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे आवशक असलेल्या **Annexure B** मधील औषधे व औषधी साहित्य यांच्या पुरवठ्यासाठी इच्छुक अधिकृत पुरवठादारांकडून सीलबंद लिफाफ्यात दरपत्रके मागवण्यात येत आहेत. **सदर दरपत्रके दिनांक १६.०६.२०२५, दुपारी १२:०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रीतीने पाठवण्यात यावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. दरपत्रकांचे लखोटे शक्यतो त्याच दिवशी सायंकाळी ४:०० वाजता उघडले जातील.**

**सर्वसाधारण नियम,अटी व शर्ती खालीलप्रमाणे,**

१) इच्छुक पुरवठादारांनी नियम,अटी व शर्तीच्या अधीन राहून **स्वतंत्र दरपत्रके** सादर करावीत.

**२)** सदरचे दर हे, शासनाकडून पुरवठा न होऊ शकणाऱ्या बाबींसाठी व तेवढ्याच कालावधीतील तातडीच्या खरेदीसाठी मागवण्यात आले आहेत. **यादीमधील नमूद बाबी व त्यांच्या समोर नोंदवलेली अंदाजित संख्या यांची खरेदी करणे या कार्यालयास बंधनकारक नाही. आवश्यकतेनुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार सदर यादीतील बाबींची खरेदी संख्या कमी /अधिक किंवा निरंक होऊ शकते.**

३) दरपत्रके अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांचे नावाने पाठवावीत.

४) दरपत्रकात नमूद केलेले दर प्रति युनिट प्रमाणे असावेत आणि ते दर किमान सहा महिने कालावधीकरीता वैध असावेत. हे सर्व दर कर व वाहतूक खर्चासह असावेत. तसेच मालाचा पुरवठा छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे दारपोच करावा लागेल , व त्यासाठी

कोणतेही अतिरिक्त शुल्क या कार्यालयाकडून दिले जाणार नाही. ह्याची नोंद घ्यावी.

५) प्रत्येक दरपत्रक स्वतंत्र बंद लिफाफ्यात पाठवावे. दर मागणी पत्राचा संदर्भ क्रमांक प्रत्येक लिफाफ्यावर आणि दरपत्रकावर स्पष्ट लिहिलेला असावा.

६) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेड वरच सादर करावीत .लेटर हेड वर आपल्या संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.

७) दरपत्रक प्रक्रिये अंती यशस्वी पुरवठादारांना खरेदी आदेश ई-मेल द्वारेच पाठवले जातील, त्यासाठी प्रत्येक पुरवठादाराने दरपत्रकामध्ये स्वतःच्या फर्मचा ई-मेल अड्रेस नमूद करणे बंधनकारक आहे.

८) खरेदी आदेश ई-मेल द्वारे पाठवलेल्या दिनांकापासून ०७ दिवसांच्या आत मालाचा पुरवठा करणे बंधनकारक आहे.

९) खरेदी आदेशानुसार औषधे/वस्तूंचा पुरवठा ०७ दिवसांत न झाल्यास रुग्णालयाच्या तातडीच्या गरजेनुसार खुल्या बाजारातून सदरची खरेदी करण्यात येईल व सदरचा खरेदी आदेश रदद केला जाईल.

१०) दरपत्रके उघडतेवेळी इच्छुक पुरवठादार उपस्थित राहू शकतात.

११) दरपत्रकांमध्ये नोंदलेल्या दरांमध्ये खाडाखोड केली असल्यास सदर दरपत्रक, अवैध घोषित केले जाईल.

१२) सदरचे दर बाजारभावापेक्षा अधिकचे नसावेत.

१३) पुरवठादाराने कोणत्याही अटी, शर्ती दरपत्रकामध्ये नमूद केल्यास सदर दरपत्रके अस्वीकृत केले जाईल.

१४) दरपत्रकासोबत खालील प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती जोडणे बंधनकारक आहे.

I) परिपूर्ण भरलेले Annexure A (100 रु च्या Stamp Paper वर )

II) अन्न व औषध प्रशासन विभागाकडील नोंदणी प्रमाणपत्र स्वसाक्षांकित प्रत ( Self attested copy of Drug License certificate)

III) जी एसटी नोंदणी प्रमाणपत्र स्वसाक्षांकित प्रत ( Self attested copy of GST registration certificate)

IV) Self attested copies of shop act license, PAN card, Aadhar card.

१५) दरपत्रक प्रक्रिया, सदर प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर अशांत: अगर पूर्ण स्थगित करणे व रद्द करण्याचे पूर्ण अधिकार अधिष्ठाता, छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा हे राखून ठेवत आहेत.

१६) सदरची औषधे ही कंपनी कडील उत्कृष्ठ मानांकीत प्रतीची असावीत

१७) औषधे पुरवठा करतेवेळी पुरवठादारंनी सदर औषधांचे In-House QC Test Certificate, Government Approved NABL Lab QC Test Report, पुरवठादारांचे FDA कडून प्राप्त वैध Non Conviction Certificate आणि औषध उत्पादक कंपनीचे वैध GMP Certificate सादर करणे बंधन कारक राहिल.

१८) न्यायालयीन अधिकार क्षेत्र- सातारा शहर फक्त.

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सातारा.

(Dr. Vinayak Kale)
Dean
Chhatrapati Sambhaji Maharaj Government
Medical College and Hospital,Satara

Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital
सत्यमेव जयते
Satara

## Annexure A

हमीपत्र (१०० रु.च्या स्टंप पेपर वर)

प्रमाणित करण्यात येते कि,

1) माझी फर्म.................. (फर्मचे नाव) चा समावेश कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालयाने काळ्या यादीत केलेला नाही.

2) मी................किंवा माझी फर्म.............. (फर्मचे नाव) या मधील कर्मचारी यांचे खरेदी प्रधीकाऱ्यासोबत कोणतेही हितसंबंध नाहीत. तसेच सादर केलेले दरपत्रक हे एकल असून दुसऱ्या कोणाशीही संगनमताने अथवा साखळी करून सादर केलेले नाही. असे आढळून आल्यास दंडात्मक कारवाईस पात्र राहीन.

3) मी............... अधिष्ठाता छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा यांनी सदर दरप्रक्रियेत नमूद केलेले सर्व नियम,अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मला याची पूर्ण जाणीव आहे कि, मी सदर पैकी कोणत्याही नियम, अटी वा शर्तीचे पालन केले नाही तर दंडात्मक व प्रतिबंधात्मक कारवाईस पात्र राहीन.

दिनांक:

ठिकाण:

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी

संपूर्ण नाव व शिक्का

## Annexure B

### List of Items

| Sr. No | Name of medicine | Required approximate qty. | Unit for rate | Rate to be quoted per unit, by supplier in rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Inj. Remdesivir 100 mg | 30 | 1 nos. | |
| 2 | Inj. Dexamethasone 4 mg/ml | 500 | 1 nos. | |
| 3 | Inj. Hydrocortisone Sodium Succinate 100mg | 500 | 1 nos. | |
| 4 | Tab. Favipiravir 400 mg | 300 | 1 nos. | |
| 5 | Tab. Favipiravir 200 mg | 200 | 1 nos. | |

अधिष्ठाता
छत्रपती संभाजी महाराज शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा.

(Dr. Vinayak Kale)
Dean
Chhatrapati Sambhaji Maharaj Government
Medical College and Hospital,Satara

Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital
सत्यमेव जयते
Satara

प्रत-
नोटीस बोर्ड,
छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
सातारा.